सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १७ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पंतप्रधान मोदींच्या आईबद्दल अपशब्द भोवले काँग्रेसच्या मोहम्मद नौशादांची उमेदवारी रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी नामांकनाची अंतिम मुदत जवळ आली असताना, महाआघाडीत अद्याप तिकीट वाटपावर एकमत झालेलं नाही. विशेषतः काँग्रेसच्या गोटात मोठ्या गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.



दरभंगा जिल्ह्यातील जाले विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसने सुरुवातीला मोहम्मद नौशाद यांना उमेदवारी घोषित केली होती. पण अखेरच्या क्षणी पक्षानं त्यांना नामांकन दाखल करण्यास थांबवलं आणि त्यांचं तिकीट रद्द करून आरजेडीचे नेते ऋषि मिश्रा यांना उमेदवार म्हणून उतरवलं.

मोहम्मद नौशाद यांचं नाव राहुल गांधींच्या वोटर अधिकार यात्रा दरम्यान चर्चेत आलं होतं. त्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईबद्दल अपशब्द वापरले गेले होते. नौशाद स्वतः त्या मंचावर उपस्थित नव्हते, तरीही भारतीय जनता पक्षाने या प्रकरणावरुन राज्यात मोठं वादळं उठवलं होतं. राज्यासह देशभरात या प्रकरणाची चर्चा झाली होती.या घटनेनंतर काँग्रेसमध्येच नौशाद यांना उमेदवारी द्यावी का, यावर तीव्र मतभेद आणि अंतर्गत तणाव सुरू झाला. शेवटी पक्षानं वाद टाळण्यासाठी त्यांचं तिकीट रद्द करून आरजेडीच्या गोटातील ऋषि मिश्रा यांना उमेदवार बनवलं.

## पंतप्रधान मोदी अन् नितीश कुमारांची जादू, बिहारमध्ये एनडीएचाच विजय होणार; मुख्यमंत्री फडणवीसांना विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७पाटणा**

बिहारमधील जनता एनडीए सोबत आहे. पंतप्रधान मोदी यांचे बिहारवर आणि बिहारमधील लोकांचे पंतप्रधान मोदी यांच्यावर खूप प्रेम आहे. पंतप्रधान मोदी आणि नितीश कुमार यांची जादू संपूर्ण बिहारवर आहे. बिहारमधील एनडीएत सहभागी असलेले सर्व पक्ष आणि त्यांचे नेते एक चांगला विजय येथे साकारतील, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही ठिकाणच्या प्रचारसभेत सहभाग घेतला. बिहारमधील विरोधकांवर टीका करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे महाठकबंधन आहे. जनतेलाही लुटत आहेत आणि आपल्या मित्रपक्षांनाही फसवत आहेत. वरवर कितीही दाखवत असले, तरी विरोधक आतून एकत्र नाहीत. कारण हे सगळे जण सत्तेच्या लालसेचे धनी आहेत. त्यांना बिहार आणि येथील जनतेशी काही देणे-घेणे नाही. त्यांना केवळ सत्तेशी मतलब आहे. हे कधीही एकत्र येणार नाही आणि एकत्र लढणार नाहीत. यांचा दारूण पराभव होणार आहे. बेगूसराय येथेही जाऊन आलो आणि तिथे प्रत्येक ठिकाणी केवळ एनडीएचीच चर्चा आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

बेगुसराय असो किंवा संपूर्ण बिहार असो, येथे एनडीएची जोरदार लाट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहार पुन्हा एकदा एनडीएसोबत आहे. बिहारचे प्रेम पंतप्रधान मोदींवर काकणभर अधिक आहे. बिहारमध्ये सरकार एनडीएचेच स्थापन होणार आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. बेगुसराय विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार कुंदन कुमार यांच्या प्रचारासाठी बिहारमधील बेगुसराय येथे भाजपचा रोड शो झाला. यामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पटना साहिब विधानसभा भाजपाचे उमेदवार रत्नेश कुशवाहा यांच्या प्रचारार्थ 'नामांकन व आशिर्वाद सभा' यामध्ये सहभाग नोंदवला. बिहार दौऱ्यावर असताना देवेंद्र फडणवीस यांनी पटना विमानतळावर ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांची भेट घेतली.

## अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पूरग्रस्त जिल्ह्यांना १३५६ कोटींची मदत; राज्य सरकारचा शासन निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ मुंबई**

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१.२१ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी १३५६ कोटी ३० लाख २२ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.



**खालील प्रमाणे मिळणार मदत**

सातारा – जिल्ह्यातील ११ हजार ११३ शेतकऱ्यांच्या चार हजार २१९.२८ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी सहा कोटी २९ लाख तीन हजार रुपये

कोल्हापूर – जिल्ह्यातील पाच हजार ८६० शेतकऱ्यांच्या एक हजार ६९६.३६ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन कोटी १८ लाख रुपये

बीड – आठ लाख सहा हजार ५१३ शेतकऱ्यांच्या सहा लाख ४४ हजार ९१८.५५ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी ५७७ कोटी ७८ लाख ९२ हजार रुपये.

धाराशिव – चार लाख चार हजार ६५६ शेतकऱ्यांच्या तीन लाख ११ हजार २९१.२३ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २९२ कोटी ४९ लाख २२ हजार रुपये

लातूर – चार लाख १५ हजार ४९२ शेतकऱ्यांच्या २३ लाख सहा हजार ६२८.९९ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २०२ कोटी ३८ लाख १९ हजार रुपये

परभणी – चार लाख ३९ हजार २९७ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८५ हजार ८५३.७८ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २४५ कोटी ६४ लाख ४९ हजार

नांदेड – ८३ हजार २६७ शेतकऱ्यांच्या ३२ हजार ७३.०२ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २८ कोटी ५२ लाख ३७ हजार रुपये.


दरम्यान, नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदत थेट जिल्हास्तरावरूनच दिली जाणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही त्यांना मदत त्वरित व कार्यक्षम पद्धतीने वितरीत होईल असंही मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले.

## जरांगे चक्क मुख्यमंत्री फडणवीसांच्या बाजूने बोलले

### म्हणाले, काही लोक अडचणीत आणतात, पण आमचा विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ जालना**

बीडमधील मोर्चा हा ओबीसींचा मोर्चा नसून, ठराविक जातींचा मोर्चा आहे. फडणवीसांच्या लक्षात आले पाहिजे की, हा मोठा गेम असू शकतो. फडणवीसांची इमेज डॅमेज करायचा प्रयत्न आहे. सरकारमध्ये यांचेच लोक, मोर्चे काढणारे अजित पवारांचे लोक आहेत, हे यांना कळत नाही का? मात्र, फडणवीसांवर शंका येते की, मुंबईतल्या आंदोलनाच्या गाड्यांना आता नोटीस आल्या आहेत. मात्र, गोड बोलून वार करू नये. पण सध्या तर फडणवीसांबद्दल असे वाटत नाही, असे मराठा आरक्षण मिळण्यासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.



पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांना जितके अडचणीत आणता येईल, तितके प्रयत्न या लोकांचे सुरू आहेत. देवेंद्र फडणवीस यांना कसा फटका बसेल, याचे काम ते करत आहेत आणि त्यासाठी बीडचा मोर्चा आहे. आम्हाला वाटते देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यातील मराठा समाजाची मने जिंकली आहेत. सध्या तरी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आम्हाला शंका नाही. आम्हाला पक्के माहिती आहे की, त्यांनी गोरगरीब मराठ्यांचे आशीर्वाद घ्यायचे ठरवले आहे. देवेंद्र फडणीस यांना गोरगरीब मराठ्यांचा आयुष्य उद्देश करण्याची इच्छा नसावी, असे आम्हाला वाटते आणि म्हणून त्यांनी जीआर काढला आहे आणि तोही हैदराबाद गॅजेटचा आधार घेऊन काढला आहे, असे जरांगे म्हणाले.

बीड मध्ये निघणार मोर्चा ओबीसींचा नाही. काही विशिष्ट जातीचे लोक उपस्थित राहणार आहेत. कारण ओबीसींच्या लक्षात आले आहे की, हा मोर्चा आपल्या फायद्याचा नाही. हा राष्ट्रवादी पुरस्कृत मोर्चा दिसत आहे. कारण त्या मोर्चात सर्व अजित दादांचे लोक त्यामध्ये दिसतात. सरकारने जीआर काढला, सरकारमधील लोक त्या विरोधात जातात आणि याचा अर्थ देवेंद्र फडणवीस यांनी समजून घ्यायला पाहिजे, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, हैदराबाद गॅजेट सांगत असेल की, मराठा हा कुणबी आहे, तर ते गेले कुठे ते तरी आम्हाला दाखवावे. आम्हाला कळेल आणि मराठ्यांच्या लक्षात येईल की, कोणता नेता व्यासपीठावर गेला आहे, कोणत्या गावाचे कोण गेलेत. ओबीसींना आरक्षण मिळू नाही, म्हणून मराठा समाज मोर्चात गेला नव्हता. मराठ्यांना आरक्षण मिळू नये म्हणून हा बीडच्या मोर्चामध्ये सहभागी झाला, अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.

## 'भुजबळ जेलमधून बाहेर आल्यानंतर सुप्रिया सुळेंनी २० कोटी दिले!' ; जरांगेंचा मोठा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७वडीगोद्री (जालना):**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी नेत्यांच्या भूमिकेवर तीव्र टीकास्त्र सोडत त्यांच्या राजकीय पाठिंब्याबद्दल मोठा गौप्यस्फोट केला आहे. 'तुम्ही जेव्हा तुरुंगातून बाहेर आलात, तेव्हा मराठा समाजानेच तुम्हाला आर्थिक मदत केली. सुप्रिया सुळे यांनी तुम्हाला २० कोटी रुपये दिले, तेव्हा तुम्ही अन्न-पाण्याला लागलात, अन्यथा तुम्हाला पुन्हा भाजी विकावी लागली



असती,' अशी परखड टीका जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर केली.

ओबीसी नेत्यांना उद्देशून बोलताना जरांगे म्हणाले, तुमचा इतिहास आम्हाला सांगण्याची गरज नाही. तुम्हाला आम्ही मोजीतही नाही. ते पुढे म्हणाले की, तुम्हाला कोणी सांगितले की ते ओबीसी नेते आहेत म्हणून? ते फक्त एका विशिष्ट जातीचे नेते आहेत आणि त्यांच्या आजच्या मोर्चात एका विशिष्ट जातीचेच लोक सहभागी होणार आहेत. ते खरे ओबीसीचे शत्रू आहेत, अशी थेट टीका जरांगे यांनी केली.

काही ओबीसी नेत्यांच्या पूर्वीच्या राजकीय आणि व्यक्तिगत जीवनावर टीका करताना जरांगे म्हणाले, बरं झालं तुम्ही शाळेत गेला आणि बाकीचे शाळेत जात नव्हते. बराच काळ जेलमध्ये गेलात. हा माणूस ओबीसीला महापापी लागला आहे. आरक्षणाला विरोध करणाऱ्या या नेत्यांमुळे ओबीसी समाजाचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

## भारतीय हवाई दलाची ताकद वाढली, शत्रूचे धाबे दणाणणार; स्वदेशी तेजस MK1A लढाऊ विमानाचं उड्डाण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नाशिक**

नाशिकमध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड च्या फॅक्टरीत तयार झालेल्या पहिल्या LCA तेजस (Tejas MK-1A) लढाऊ विमानाचे यशस्वीपणे उड्डाण करण्यात आले आहे. त्याच बरोबर क-ङ च्या क्ढढ-४० प्रशिक्षण विमानांच्या दुसऱ्या उत्पादन लाईनचे उद्घाटनही या दिवशी करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत तेजस विमान हवेत झेपावले. या विमानाचं उड्डाण जरी झाले असले तरीही भारतीय हवाई दलात त्याचा समावेश होण्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहे.



तेजस MK-1A हे भारताच्या स्वदेशी लढाऊ विमानांच्या क्षमतेचा एक टप्पा आहे. परदेशांवर अवलंबित्व कमी करणे हे याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. हे विमान पूर्वीच्या मॉडेल्सपेक्षा अधिक सक्षम व बहुउद्देशीय असणार आहे. ज्यामुळे हवाई दलाच्या लढाऊ तुकडींमध्ये नवीन वर्षभरात बदल अपेक्षित आहेत. तेजस भारताचं स्वदेशी लढाऊ विमान आहे. ते ४.५ पिढीतील मल्टी रोल फायटर जेट आहे. तेजस हवाई संरक्षण, जमिनीवर हल्ला आणि सागरी हल्ला करण्यास सक्षम आहे. याआधी तेजस चज्ञ१ भारतीय हवाई दलात आहे परंतु Mk1A त्याचे आधुनिक व्हर्जन आहे. त्यात नवीन तंत्रज्ञान आहे जे या विमानाला अधिक सक्षम बनवते.

## कंत्राटदारांच्या थकीत देयकांसाठी १६८० कोटी रुपयांचा निधी मंजूर

### राज्य कंत्राटदार महासंघाच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

राज्यातील जलजीवन मिशन अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या थकीत देयकांसाठी शासनाकडून १६८० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. जवळपास दहा महिन्यांपासून राज्यातील कंत्राटदारांची जलजीवन मिशनच्या कामांची देयके थकली आहेत. या काळात संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला. शासनाशी झालेल्या अनेक चर्चाअंती अखेर १६८० कोटींचा निधी मंजूर झाला. हा निधी आम्ही शासनाकडून अक्षरशः खेचून आणला आहे, असे भोसले यांनी सांगितले.



या योजनेंतर्गत सुमारे १२,५०० कोटी रुपयांची देयके अद्यापही प्रलंबित आहेत. या देयकांची तातडीने पूर्तता व्हावी, यासाठी पुढील काळातही संघटना संघर्ष सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जलजीवन मिशन ही केंद्र आणि राज्य सरकारची संयुक्त योजना असून, दोन्हींकडून प्रत्येकी ५० टक्के वाटा उचलला जातो. मात्र, चुकीच्या अंदाजपत्रकांमुळे आणि कामांतील विसंगतींमुळे अनेक ठिकाणी कंत्राटदारांना अडचणींना सामोरे जावे लागले. राज्य आणि केंद्रस्तरावर झालेल्या बैठकींमध्ये आम्ही आमच्या मागण्या ठामपणे मांडल्या. आमच्या पाठपुराव्यामुळेच शासनाला निर्णय घ्यावा लागला. उर्वरित निधीसाठीही आम्ही लवकरच पुढील पावले उचलू, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# खरेदी दिवाळीची....

काय म्हणताय मंडळी, बरे आहात ना? दिवाळी चार दिवसांवर येऊन ठेपली. खरेदी झाली की नाही? आकाश कंदील, रोषणाईच्या माळा दारा-खिडक्यांमध्ये लावल्या की नाही? अहो, करायलाच पाहिजे. सण आहे म्हटलं तर साजरा केलाच पाहिजे. दिवाळी म्हटले की, काय काय तयारी करायची असते. घर सजवायचं असतं. खरी दिवाळी असते चिल्लर गँगची. त्यामुळे त्यांच्यासाठी किल्ला बनवण्यापासून दिवाळीची सुरवात होते. याशिवाय दिवाळी म्हटले की, आठवतात ती नवीन कपड्यांची खरेदी, फटाके, सुगंधी उटणे, फराळाचे पदार्थ, दिवाळी पहाटचे कार्यक्रम, भाऊबीजेची ओवाळणी इत्यादी इत्यादी असे बरेच काही. या सर्वांशिवाय आणखी एक गोष्ट दिवाळीमध्ये लागते म्हणजे लागतेच.

परवा एकाने सोशल मीडियावर लिहिले की, दिवाळीची सगळी खरेदी झाली. नवीन कपडे पण खरेदी केले, तरी पण काहीतरी राहिले आहे, असे वाटत होते. ते काय राहिले आहे ते बराच वेळ समजत नव्हते, आठवत नव्हते. काहीतरी न्यून राहिले आहे, असे वाटत होते, हे नक्की.

शेवटी एकदम डोक्यात प्रकाश पडला. चपला घालून थेट बाजारात गेलो आणि मोती साबण घेऊन आलो. तेव्हा कुठे दिवाळी आल्याचा फील आला. दिवाळी आणि हा साबण हे जणू समीकरणच बनले आहे. हाच तो ७० वर्षांपासून आपल्या देशातील दिवाळी परिपूर्ण करणारा मोती साबण. तुम्ही एरव्ही इतर कंपन्यांचे साबण वापरा; पण दिवाळीला हाच येतो. त्याशिवाय दिवाळी साजरीच होत नाही, अशी काहीशी त्या साबणाविषयी तमाम मराठी लोकांची धारणा झाली आहे. एकदाचा दिवाळीला आणला क पार संक्रांतीपर्यंत पुरत असतो. केवळ दिवाळीच्या काळात तुमच्या आमच्या मनात आणि डोळ्यांसमोर येणारी ही हमखास गोष्ट आहे.एरव्ही याची कुणी आठवणही काढत नाही. आधी कोणा उद्योजकाने सुरू केलेला हा साबण नंतर टाटांच्या एका मोठ्या कंपनीने विकत घेतला आणि इमानेइतबारे त्याची दरवर्षी विक्री दिवाळीमध्ये होत असते. तुम्हाला प्रश्न पडेल की, एरव्ही या साबणाची फॅक्टरी बंद असते की काय? अजिबात तसे नसते. वर्षभर तयार केलेला साबण एकदाच दिवाळीच्या सणामध्ये पूर्णतः विक्री होतो आणि कारखाना पुन्हा पुढच्या दिवाळीसाठी नवीन साबण तयार करायला सुरुवात करतो. आहे की नाही मार्केटिंगची कमाल? एरव्ही तुम्हाला या साबणाच्या जाहिराती कधीही दिसणार नाहीत. दिवाळी जवळ आली की, या जाहिराती दिसायला लागतात आणि तो यथावकाश तुमच्या घरामध्ये येतो. फार पूर्वी मोठी कुटुंबे असत आणि संपूर्ण कुटुंबीयांमध्ये एकच साबण असे. आता चारजणांचे कुटुंब असले तरी त्या प्रत्येकाचा साबण वेगळा असतो. दिवाळी सण मोठाच्या ऐवजी, मोती साबणाचा गोटा, नाही आनंदाला तोटा, असे म्हणता येऊ शकेल. तर मग मंडळी दिवाळी खरेदीमध्ये काही न्यून उरले आहे, असे वाटत असेल तर चला बाजारात...

# वसुबारस का साजरा करतात?

## दिवाळीच्या पहिल्या दिवशी कोणते धार्मिक विधी करावे?

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

दिन दिन दिवाळी... गायी म्हशी ओवाळी... प्रकाशाचा हा सण प्रत्येकासाठी उत्साहाचा असतो. दिवाळीचा पहिला दिवस आणि पहिली पणती ही वसुबारस सणाने प्रज्वलित करून शुक्रवार, दि. १७ पासून वसुबारसने दिवाळीला प्रारंभ होत आहे. गाय-वासराचे पूजन करून हिंदू संस्कृतीतील गोमातेचे महत्व अधोरेखित केले जाते. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वसुबारस साजरा केला जातो. शहरात गायवासराच्या मूर्तीचे पूजन करूवसुबारस: धन-समृद्धीचा सण

हिंदू संस्कृतीत दिवाळी हा सण आनंद, समृद्धी आणि प्रकाशाचा प्रतीक आहे. महाराष्ट्रात दिवाळीची सुरुवात वसुबारसने होते.

आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील द्वादशी तिथीला साजरा होणारा हा सण, 'गोवत्स द्वादशी' म्हणूनही ओळखला जातो. 'वसु' म्हणजे धन किंवा संपत्ती आणि 'बारस' म्हणजे द्वादशी. हा दिवस गाय आणि वासराच्या पूजनाने सुरू होतो. यामुळे परात सुख-समृद्धी येते असे मानले जाते. वसुबारस हा केवळ धार्मिक विधींचा सण नसून निसर्गाशी आणि प्राण्यांशी असलेल्या नात्याची आठवण करून देणारा दिवस आहे.न दिवाळीची नांदी होणार आहे.




दिवाळीच्या पहिल्या दिवशी कोणते धार्मिक विधी करावे

वसुबारसच्या दिवशी घरांमध्ये विशेष विधी पाळले जातात. गायी आणि वासरांना आंघोळ घातली जाते, त्यांच्या अंगावर हळद लावली जाते आणि त्यांना नवीन कपड्यांनी सजवले जाते. या दिवशी गुरांना अंकुरलेले मूग आणि हरभरा खायला दिले जातात. महिला गहू आणि मूग वर्ज्य करून उपवास करतात आणि फक्त बाजरी भाकरी आणि चवळीच्या कढीने उपवास पूर्ण करतात.

वसुबारस हा केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नाही; तो शेती आणि कुटुंब कल्याणासाठी देखील महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी घरात समृद्धी, मुलांचे आरोग्य आणि आनंदासाठी प्रार्थना केली जाते. दिवाळीच्या सुरुवातीच्या काळात रांगोळी काढणे आणि तुळशीच्या रोपासमोर आणि दारात दिवे लावणे ही या दिवशीची खास परंपरा आहे. संध्याकाळी, गायीची पूजा करून एक विशेष आरती केली जाते.

### पाच दिवसांच्या दिवाळीची नांदी

वसुबारसने दिवाळी साजरी करण्याचा प्रारंभ होणार असून त्यानंतर पाच दिवस दिवाळीची धामधूम सरू होणार आहे. शनिवारी धनत्रयोदशी, सोमवारी नरकचतुर्दशी, मंगळवारी लक्ष्मीपूजन, बुधवारी दीपावली पाडवा व गुरुवारी भाऊबीजेने दिवाळीची सांगता होणार आहे.

# नांदगाव पेठ धनगरपुरा येथे ८ फूटांचा अजगर पकडला

## सर्पमित्रांची धाडसी कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ परिसरातील धनगर पुरा येथील सूरज राऊत यांच्या शेतात बुधवारी तब्बल आठ फूट लांबीचा अजगर आढळल्याने एकच खळबळ उडाली.

शेतातील कामगारांना हा अजगर दिसताच त्यांनी तत्काळ सर्पमित्र रवी बेंडे यांना संपर्क साधला सर्पमित्र रवी बेंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत अजगराला सुरक्षितपणे पकडले.

त्या अजगराने शेतातील एका मांजरीला गिळंकृत केले होते,

सर्पमित्रांनी मृत मांजरीला अजगराच्या विळख्यातून बाहेर काढत मांजरीवर अंत्यसंस्कार केले.या रेस्क्यू मोहिमेत सर्पमित्र रवी बेंडे यांच्यासोबत आशिष निमकर्डे व जतीन कोठारे यांनीही सहभाग घेत कौशल्याने



अजगराला पकडून सुरक्षितपणे वाळकी धरण परिसरात सोडण्यात आले.स्थानिक नागरिकांनी सर्पमित्रांच्या तात्काळ प्रतिसाद व धाडसाचे कौतुक केले.

# कपाशीवर 'स्पोडोप्टेरा' अळीचा प्रादुर्भाव वाढला; 'असे' करा व्यवस्थापन

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

कपाशीच्या पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे. अमरावती विभागातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच राज्यातील अनेक भागात देखील कमी अधिक प्रमाणात कपाशीवर ही कीड आढळून येत असून, या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास उत्पादनात घट येण्याची शक्यता कृषितज्ज्ञांनी वर्तविली आहे.

विभागात यंदा कपाशीच्या क्षेत्रात घट झाली आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार विभागात १० लाख ९२ हजार ६१० हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड अपेक्षित असताना १० लाख ३९ लाख ५०९ हेक्टरवरच कपाशीची लागवड झाली.

वारंवार अतिवृष्टी झाल्याने आधीच शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्च दुप्पट झाला.त्यामुळे खर्चसुद्धा निघेल किंवा नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना आता भेडसावत आहे. बहुतांश भागातील कपाशी पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे ही अळी दिवसा पिकावर दिसून येत नाही.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

मात्र, रात्रीच्या सुमारास पिकाचे नुकसान करते. या किडीच्या नियंत्रणासाठी पीडीकेव्हीचे कीटकशास्त्र विभागप्रमुख डी. बी. उंदीरवाड यांनी शेतकऱ्यांना उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

**अळीमुळे असे होते कपाशीचे नुकसान ?**



या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंड्यांमधून लहान लहान अळ्या समूहात बाहेर येतात व प्रथमतः त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजूने राहून खातात. पाने जाळीदार होतात. या अळ्या नंतर मोठ्या होऊन स्वतंत्रपणे पाने, शेंडे, फुले, पात्या व बोंडे पोखरून खातात. परिणामी, उत्पादनात मोठी घट येते.

**असे करा व्यवस्थापन**

शेतात हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे लावावेत.

अंडी व अळीग्रस्त पाने तोडून किडीसह नष्ट करावीत.

दुर्भावाच्या सर्वेक्षणाकरिता प्रत्येक किडीसाठी हेक्टरी १० कामगंध सापळे लावावेत.

सापळ्यामध्ये प्रति दिन ८ ते १० पतंग २ ते ३ दिवस आढळल्यास नियंत्रणासाठी उपायोजना करावी.

सापळ्यातील अळीचे पतंग रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत.

याशिवाय आर्थिक नुकसान पातळी (५ टक्के पाते, फुले व बोंडांचे नुकसान) दिसून येताच क्लोरेंट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रति एकर किंवा स्पिनोटोरम ११.७० टक्के एससी २०० मिली प्रति एकर किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी ३७५ मिली प्रति एकर किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी सायपरमेथ्रीन ५ टक्के ईसी ४०० मिली प्रति एकर यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## प्रोटीन पावडर घेणाऱ्यांनो सावधान! चाचणीतून धक्कादायक माहिती उघड, शरीरावर काय परिणाम?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

जगभरात मागील दोन दशकांपासून प्रोटीन पावडरचा वापर केवळ बॉडीबिल्डिंग (शरीरसौष्ठव) आणि फिटनेससाठी नव्हे तर सामान्य पोषण, वजन वाढविणे यासाठी केला जातो. मात्र आता कन्झ्युमर रिपोर्ट्सने केलेल्या चाचणीनुसार, लोकप्रिय प्रोटीन पावडर आणि शेकमध्ये अतिरिक्त प्रमाणात शिसे असल्याचे दिसून आले आहे. तज्ज्ञांनी त्यांच्या सेवन मर्यादित प्रमात करावे, असा सल्ला दिला आहे.

न्यू यॉर्क टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार, कन्झ्युमर रिपोर्ट्सच्या ताज्या तपासणीत, संशोधकांनी मोठ्या प्रमाणावर विकल्या जाणाऱ्या प्रोटीन पावडर आणि रेडी-टू-ड्रिंक प्रोटीन शेकचे विश्लेषण केले. १४ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेल्या या निष्कर्षांनुसार, काही प्रोटीन पावडरमध्ये शिसेचे प्रमाण इतके जास्त आहे की त्यांचे सेवन टाळण्याचा किंवा मर्यादित ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. या अहवालात असे नमूद केले आहे की, तपासणी केलेल्या २३ प्रोटीन पावडर आणि शेकपैकी दोन-तृतीयांशहून अधिक उत्पादनांच्या एका सर्व्हिंगमध्ये कन्झ्युमर रिपोर्ट्सच्या अन्न सुरक्षा तज्ज्ञांनी एका दिवसात सुरक्षित मानलेल्या प्रमाणापेक्षा जास्त शिसे होते. तर काही प्रकरणांमध्ये हे प्रमाण मर्यादेच्या १० पटीने अधिक होते.

**कशामुळे वाढले शिसे प्रमाण?**

वनस्पती माती, पाणी आणि हवेतून नैसर्गिकरित्या पोषक तत्वांसह दूषित घटकही शोषून घेतात. जड धातू नैसर्गिक स्त्रोतांकडून (जमीन) किंवा मानवनिर्मित औद्योगिक प्रदूषण, कीटकनाशकांचा वापर, रस्त्यावरील धूळ किंवा सांडपाण्याचे सिंचन या माध्यमातून येते. प्राण्यांमध्ये जड धातू सामान्यतः दूषित चारा, माती, पाणी किंवा हवेद्वारे अन्नसाखळीत प्रवेश करतात. कन्झ्युमर रिपोर्ट्सने २३ प्रोटीन सप्लिमेंट्सची (यात दुग्धजन्य, गोमांस आणि वनस्पती-आधारित पावडर व रेडी-टू-ड्रिंक शेकचा समावेश आहे) चाचणी केली. प्रत्येक



उत्पादनाचे एकाधिक नमुने तीन महिन्यांच्या कालावधीत वेगवेगळ्या किरकोळ विक्रेत्यांकडून खरेदी करण्यात आले. यामध्ये प्रोटीन पावडरमध्ये शिसे प्रमाण अतिरिक्त असल्याचेस्पष्ट झाले. सुमारे ७०% उत्पादने दररोजच्या शिफारस केलेल्या ०.५ मायक्रोग्राम मर्यादेच्या १२०% पेक्षा जास्त होती. तीन उत्पादनांमध्ये कॅडमियम आणि अजैविक आर्सेनिक (एक विषारी धातू जो ज्ञात कर्करोगकारक म्हणून वर्गीकृत आहे) चे प्रमाण देखील सुरक्षित पातळी ओलांडली होती.

हे निष्कर्ष चिंताजनक आहेत कारण अशा प्रकारच्या प्रोटीन पावडरच्यासेवनाने मुलांच्या मेंदूला नुकसान होण्याचा धोका आहे. तर प्रौढांमध्ये उच्च रक्तदाब, मज्जातंतूंचे नुकसान, मूत्रपिंडाच्या समस्या आणि पुनरुत्पादक समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. आर्सेनिक आणि कॅडमियमची वाढलेली पातळी कोणत्याही वयात कर्करोगाच्या वाढीव जोखमीशी संबंधित असल्याचेही रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच कोणती उत्पादन टाळावी, याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

# भाजपा आमदार शिवाजीराव कर्डिले यांचं हृदयविकाराने निधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अहिल्यानगर -**

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री, राहुरीचे भाजपाचे आमदार शिवाजीराव कर्डिले (वय ६६) यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे.आमदार कर्डिले यांना पहाटे त्रास जाणवू लागला. त्यांना अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी नगर -नेवासा आणि राहुरी मतदार संघातून विधानसभेचे प्रतिनिधित्व केले होते. ते



सहाव्यांदा आमदार होते.राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डीले यांचं अल्पशा आजाराने निधन झाल्याचं वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांचं असं अकाली जाण्याने त्यांचं कुटुंब आणि मतदारसंघासह सर्वांनाच धक्का बसला आहे. अनेकदा आमदार, राज्यमंत्री, अहिल्यानगर जिल्हा बँकेचे चेअरमन आदी विविध पदांवर त्यांनी केलेलं लोकाभिमुख कार्य कायम स्मरणात राहील. हे दुःख पचवण्याची ताकद त्यांच्या कुटुंबियांना मिळो, ही प्रार्थना! आम्ही सर्वजण त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत असं सांगत आमदार रोहित पवार यांनी त्यांना भावपूर्व श्रद्धांजली वाहिली आहे.

# चांदूर उप विभागातील ३५ हजार शेतकऱ्याच्या खात्यात २२ कोटी ५८ लक्ष जमा

## सप्टेंबर महिन्याच्या अतिवृष्टीच्या नुकसानाची मिळणार भरीव मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ धामणगाव रेल्वे**

जुलै, ऑगस्ट महिन्यात चांदुर उपविभागातील तीन तालुक्यात सततधार पाऊस, अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या ५८ हजार ४१६ शेतकऱ्या पैकी ३५ हजार ७४७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३७ कोटी १५ लक्ष पैकी २२ कोटी ५८ लक्ष रुपये जमा झाले असल्याची माहिती चांदुर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांनी दिली

धामणगाव रेल्वे चांदुर रेल्वे नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यात जुलै ऑगस्टमध्ये सतत पाऊस व अतिवृष्टी झाली यामध्ये चांदुर रेल्वे तालुक्यातील १९ हजार ५१० शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले १३ कोटी ४३ लक्ष रुपये मंजूर झाले १ ३ हजार ५३ शेतकऱ्यांच्या खात्यात ८ कोटी १३ लक्ष जमा झाले धामणगाव रेल्वे तालुक्यातील २१ हजार १९४ शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानासाठी १२ कोटी ३९



लक्ष मंजूर झाले ९ हजार ९८९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६ कोटी ५० लक्ष जमा करण्यात आले नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील १७ हजार ७१२ शेतकऱ्यासाठी ११ कोटी ३२ लक्ष मंजूर झाले होते १२ हजार ७०५ शेतकऱ्यांच्या खात्यात ८ कोटी २१ लक्ष रुपये जमा झाले आहे ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढला नाही त्या शेतकऱ्यांच्या खात्यात इतर रक्कम जमा व्हायची आहे

सप्टेंबर महिन्याच्या अतिवृष्टीत झालेल्या नुकसानाची मिळणार भरीव मदत

चांदुर रेल्वे उपविभागात सर्वाधिक नुकसान सप्टेंबर महिन्यात झाले शासनाच्या नव्या आदेश तीन हेक्टर क्षेत्राप्रमाणे शेतकऱ्यांना भरीव मदत मिळणार आहे तसेच जुलै ऑगस्टमध्ये झालेल्या पावसाचे नुकसानाचे अतिरिक्त फरकाची मदतीही शेतकऱ्यांना मिळणार असून त्या संदर्भातील अहवाल जिल्हा प्रशासनाला पाठविण्यात आला असल्याचे कोरे यांनी सांगितले.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १७ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# बाफना कंपनीच्या निकृष्ट सोयाबीन बियाण्याने शेतकरी उद्ध्वस्त

## शेंगांत दाण्यांचा पत्ताच नाही! विदर्भातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

### कंपनी व कृषी विभागावर मिलीभगतीचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव पेठ**

अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांवर या हंगामात अभूतपूर्व संकट कोसळले आहे. बाफना कंपनीने बाजारात आणलेल्या सोयाबीन बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, शेंगामध्ये दाण्यांचा पत्ताच नसल्याने शेतकऱ्यांचे सर्वस्व उद्ध्वस्त झाले आहे. शेतकऱ्यांनी बाफना कंपनीचे २५ किलो वजनाचे बियाण्याचे पोते ३२०० रुपयांना नगदी खरेदी करून पेरले, मात्र पेरणीच्या वेळीच या बियाण्यांची उगवण शक्ती अत्यंत कमी आढळली. या संदर्भातील शेकडो तक्रारी कृषी विभागाकडे नोंदवण्यात



आल्या.

तरीही विभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही.साडेतीन महिन्यांपासून शेतकऱ्यांनी मशागत, फवारणी, खत-टॉनिक, फंगीसायड आणि कीटकनाशकांवर हजारो रुपये खर्च केले, परंतु परिणाम शून्य! शेंगा लागल्या तरी त्यात दाणे नाहीत. आज चार महिने उलटूनही या सोयाबीनचे पाने आणि दांड्या हिरवेच असून दाण्यांचा विकास झालेला नाही. या संदर्भात शेतकऱ्यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कंपनीचे अधिकारी फोन उचलत नाहीत आणि शेतावर यायलाही तयार नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली.शिवसेनेचे तालुकाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी बाफना कंपनीवर तीव्र शब्दांत हल्ला चढवत म्हटले की,बाफना कंपनीने निकृष्ट, रोगीट बियाणे बाजारात आणून विदर्भातील शेतकऱ्यांना उध्वस्त केले आहे. कृषी विभाग आणि बियाणे महामंडळ यांची या सर्व प्रकरणात मिलीभगत असल्याचा त्यांनी आरोप केला.हटवार यांनी मागणी केली की, ज्या शेतकऱ्यांकडे कृषी केंद्राकडून खरेदी केलेल्या बाफना कंपनीच्या बियाण्यांची बिले आणि फवारणीच्या खर्चाचे पुरावे आहेत, त्या सर्व शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी.जर बाफना कंपनीने नुकसान भरपाई दिली नाही, तर कंपनीविरोधात पोलीस तक्रार दाखल करून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नितीन हटवार यांनी दिला आहे.दरम्यान, कृषी विभाग आणि बियाणे महामंडळाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा लुटणाऱ्या कंपन्यांना सरकारने रोखले पाहिजे, नाहीतर हे आंदोलन विदर्भभर पेटेल,असा गर्भित इशारा हटवार यांनी दिला आहे.

# महसूल सेवकांना तलाठी भरतीत प्राधान्य देणार

## महसूल सेवकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**–महसूल सेवकांचा समावेश चतुर्थ श्रेणीमध्ये करुन त्यांना मानधना ऐवजी वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी अशी महसूल सेवकांची मागणी होती. याबाबत महसूल मंत्र्यांनी मंत्रालयात तातडीची बैठक घेऊन त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. वेतन श्रेणी लागू करता येत नसल्यामुळे त्यांना तलाठी भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवून अनुभवा प्रमाणे अधिक गुण वाढवून देण्याच्या मुद्दावर सकारात्मक चर्चा झाली. महसूल सेवकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असे आश्वासनही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.महसूल सेवकांच्या प्रश्नाबाबत महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव राजेश मिना, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव सचिव ओमप्रकाश गुप्ता, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव



विकास खारगे आणि महसूल सेवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.बावनकुळे यांनी महसूल सेवकांचे उपोषण सोडविताना त्यांचे प्रश्नही प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार गुरुवारी मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यां सोबत झालेल्या बैठकीत विविध पर्यायांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत तरतूद नसल्याचा मुद्दा चर्चेला आला. त्यामुळे त्याला पर्यायी व्यवस्था करण्यासाठी महसूलमंत्र्यांनी पुन्हा राज्याचे मुख्य सचिव राजेश मिना यांच्या कार्यालयात बैठक घेतली.या बैठकीमध्ये महसूलमंत्र्या ंनी महसूल सेवकांना वेतन श्रेणी देता येत नसली तरी त्यांच्या सेवेचा आणि अनुभवाचा विचार करुन त्यांना तलाठी भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवण्याचा मुद्दा मांडला. त्याबरोबरच ज्यांना पाच वर्षांचा महसूल सेवकाचा अनुभव आहे. त्यांना २५ गुण अतिरिक्त देण्याच्या मुद्दावरही चर्चा झाली. याबाबत अधिकाऱ्यांनीही सकारात्मकता दर्शविली असून लवकरच याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. महसूल सेवकांच्या इतर प्रश्नांवरही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल,असे आश्वासनही महसूलमंत्र्यांनी बैठकीवेळी दिले. महसूल सेवकांना यापूर्वीच मानधन वाढ देण्यात आली आहे. त्याबरोबरच त्यांच्या प्रश्नांना सरकार कायम प्राधान्य देत असते. सध्या ऑनलाईन पद्धतीने सर्व सेवा देण्यात येत असल्याने महसूल सेवकांचे बरेच काम कमी झाले आहे. पूरस्थितीच्या काळात अनेक महसूलसेवक संपावर होते. त्यामुळे अधिकाऱ्यांना काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. याचाही महसूल सेवकांनी विचार करायला हवा, अशीही चर्चा झाली.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीत पक्ष नेतृत्वाला पडलाय पेच

## राजकारण गतीमान : नगराध्यक्षपद अनुसूचित जाती करीता राखीव, इच्छुकाच्या आशा पल्लवीत

सचिन पाटील अब्रुक
**दि.१७अंजनगाव सुर्जी**

नगराध्यक्षपदासाठीचे आरक्षण 'अनुसूचित जाती' अर्थात एच सी प्रवर्गासाठी निघाल्याने अध्यक्षपदाची निवडणूक लढण्यास इच्छूकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. देवी पावली, असा भास त्यांना होत आहे, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवाराला निवडणूक लढविता येणार नसल्यामुळे अनुसूचित जातीच्या इच्छुकांची भाऊगर्दी वाढणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षापुढे पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.अनेकदा विशिष्ट प्रवर्गासाठी अध्यक्षपद आरक्षित झाल्यावर तीव्र इच्छा असताना अनेकांना निवडणूक लढता येते. पण नगराध्यक्षपदाचे आरक्षण यावेळी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी निघाल्यामुळे ही संधी आपल्यालाच मिळावी, यासाठी अनेकजण सक्रिय झाले आहेत. राजकीय पक्ष व इच्छुकांकडून नव्या समीकरणाला सुरुवात झाली आहे. अनेक वर्षानंतर थेट नागरिकांमधून नगराध्यक्ष निवडले जाणार आहे. त्यामुळे निवडनुकीच्या काळात नाही'तर इतर वेळेसही जास्तीत जास्त चांगला जनसंपर्क ठेवणाऱ्या उमेदवाराला फायदा होणार आहे.



दिवाळीची धामधुम सरू असून ही कोणीही अन्य विषयावर बोलताना दिसून येत नाही.त्यामुळे आता सामना चांगलाच रंगणार ' हे वाक्य यातच इच्छुकांची वाढती संख्या पाहता सर्व राजकीय पक्ष सर्वांच्या तोंडातून निघत आहे. मागील निवडणुकीत अनुसूचित

### इच्छुक नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचा खर्च वाया

नगराध्यक्ष आरक्षण निघण्याच्या आधी अनेक इच्छुक उमेदवारांनी मीच नगराध्यक्ष होणार असल्याने लाखो रुपये खर्च करून शूभेच्छाचे बॅनर लाऊन प्रचार केला होता मात्र नगराध्यक्षपदाचे आरक्षण अनुसूचित जाती वर्गाचे निघाल्यामुळे इच्छुक नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना ब्रेक लागला असून झालेला खर्च वाया गेला असल्याचे बोलल्या जात आहे–

स्वतंत्रपणे पुन्हा एकदा आपली 'ताकद आजमावतात की एकमेकांशी हातमिळवणी करून निवडणुकीला सामोरे जातात, याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

६ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले. त्यातच अनुसूचित जाती प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद निघाल्याचे कळताच खुल्या प्रवर्गातील ' उमेदवारासहसर्वांच्या आनंदाला ब्रेक लागले सध्या जाती प्रभागातून निवडून आलेल्या काहीं माजी, तर काही विद्यमान सदस्यांच्या आशा यामुळे पल्लवीत झाल्याचे दिसून येत आहे.याशिवाय पंचवार्षिक प्रमाणे यंदाची निवडणूक चांगलीच रंगणार असल्याचे दिसून येत आहे. आता राष्ट्रीय' पक्षाकडून कुणाला तिकीट मिळते, कुणाला अपक्ष मैदानात उतरावे लागते, यावरही बरीच गणिते अवलंबून राहणार आहे.

# दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सांस्कृतिक भवन उजळले अमरावतीच्या सर्जनशीलतेने

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१७ अमरावती**–अमरावती महानगरपालिका तर्फे आयोजित दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन आज सांस्कृतिक भवन, अमरावती येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या उद्घाटन सोहळ्याला शहरातील मान्यवर, अधिकारी, कलाकार, छायाचित्रकार, महिला बचत गट प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीपप्रज्वलन आणि गणेशवंदना करून उद्घाटन मा. आमदार सौ. सुलभाताई खोडके व महानगरपालिका आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सांस्कृतिक भवन दिव्य रोषणाईने सजविण्यात आले असून, दिवाळीच्या स्वागताचा सोहळा शहरातील नागरिकांसाठी अविस्मरणीय ठरला आहे.

या प्रसंगी आमदार सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या की, महानगरपालिकेने राबविलेला हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक आहे. यातून कलाकार, महिला बचत गट आणि



लघुउद्योजकांना प्रोत्साहन मिळत आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी प्रास्ताविकात सांगितले की, 'दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, शहरातील सर्जनशीलतेचा आणि सामूहिक ऐक्याचा उत्सव आहे. फोटोग्राफी प्रदर्शनातून अमरावतीचे सौंदर्य आणि सामाजिक जीवनाचे विविध पैलू सुंदररीत्या मांडले गेले आहेत.या महोत्सवात लोककला, नृत्य, संगीत, बचत गटांची उत्पादने आणि स्थानिक उद्योजकांचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरले आहेत. तसेच 'स्वच्छ अमरावती' मोहिमेअंतर्गत ठठठ सेंटर उपक्रमाची माहितीही नागरिकांना देण्यात आली. १६ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार असून, सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. या उपक्रमामुळे अमरावतीच्या संस्कृतीला नवा साज चढला असून, दिवाळीचा उत्सव सामाजिक ऐक्य आणि सर्जनशीलतेचा दीप प्रज्वलित करणारा ठरला आहे.या महोत्सवाला उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, महिला व बाल विकास अधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, विधी अधिकारी श्रीकांतसिंह चव्हाण, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, भांडार अधिक्षक मंगेश जाधव, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, नगरसचिव संदिप वडुरकर, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, मुख्य अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, कार्यालय अधिक्षक गुलशन मिरानी, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता, अभियंता, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेळघाटातील आदिवासी कलेक्ट्रेटवर मुक्कामी उपोषणाला बसले

## रस्ता, पूल आणि वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

मेळघाटातील आदिवासींनी रस्ते, पूल आणि वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुक्कामी उपोषण सुरू केले आहे. तीन जणांचा बळी गेल्यानंतरही खंडू नदीवर पूल न बांधल्याने, तसेच रस्त्यांची दुरवस्था आणि गावांमध्ये अंधार असल्याने त्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. दिवाळीपूर्वीच सर्व कामधंदे सोडून ते उपोषणाला बसले आहेत.

खुटीदा आणि एकताईमधून वाहणाऱ्या खंडू नदीवर पूल नसल्याने अनेक दुर्घटना घडल्या आहेत. १८ सप्टेंबर रोजी एकताई येथील रावजी रोना बेठेकर पुरात वाहून गेले, त्यांचा मृतदेह सहा किलोमीटर अंतरावर सापडला. यापूर्वी नंदलाल झोलांग बेठेकर यांचा दहा वर्षांचा मुलगा आणि एक अंगणवाडी सेविकाही पुरात वाहून गेल्या होत्या. पूल बांधण्याचे केवळ आश्वासन मिळाले, प्रत्यक्ष कृती झाली नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

खुटीदा आणि सिसोरीदरम्यानचा सहा किलोमीटरचा रस्ता अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत आहे. खुटीदा येथील खंडू नदीपासून सुमोरीपर्यंत टिकाऊ रस्त्याची मागणी जुनी आहे. तसेच, सुमीता गावापासून खुटिया-सुमोरी रस्त्यावरील नंदराम गुलाई फाट्यापर्यंत दोन किलोमीटरचा टिकाऊ रस्ता आणि सुमोरी ते आवला गुलाई हा तीन किलोमीटरचा रस्ताही अद्याप तयार झालेला नाही.

खुटीदा फाट्यापासून गावापर्यंतच्या दीड किलोमीटर अंतरावर विजेचा पुरवठा नाही, त्यामुळे रात्रीच्या वेळी पूर्ण अंधार असतो. या मार्गावरून जाताना अनेकदा जंगली श्वापदांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे हल्ल्याची भीती असते. त्यामुळे या रस्त्यावर वीज पुरवठा करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.गुरुवारी दुपारनंतर एकताई, खुटीदा, सुमीता, सुमोरी येथील आदिवासी जिल्हाधिकारी



कार्यालयावर पोहोचले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेतली. समस्या मांडून त्या सोडवण्याची मागणी केली, परंतु ठोस उत्तर न मिळाल्याने त्यांनी कलेक्ट्रेटवरच राहुटी ठोकून उपोषण सुरू केले आहे.

आदिवासींनी केलेल्या मागण्या महसूल, जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग, महावितरण, वनखाते आणि सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे या सर्व विभागांची संयुक्त बैठक घेऊन समस्या सोडवाव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.


# विमान तिकीट २० हजार! बसवाल्यांनीही सुरू केली दरवाढीची स्पर्धा तर रेल्वे तिकिटांचा 'वेटिंग'चा खेळ

## सामान्यांना दिवाळीत घरी येणे झाले महाग;

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ नागपूर–** दिवाळीचा सण जवळ येताच घरापासून दूर राहणारे विद्यार्थी, नोकरी आणि व्यवसायानिमित्त इतर शहरांत असलेले नागपूरकर घरी परतण्याची लगबग करतात. पण, यंदा या प्रवासाचा आनंद महागात पडणार आहे. पुणे व मुंबई ते नागपूर या मार्गावरील विमान आणि बस प्रवासाचे दर अक्षरशः आकाशाला भिडले आहेत.

पुणे आणि मुंबईहून नागपूरकडे येणाऱ्या विमानांच्या तिकिटांचे दर मागील काही दिवसांत झपाट्याने वाढले आहेत. सध्या काही विमानांचे दर १५ ते २० हजारांपर्यंत पोहोचले असून, हे दर नेहमीच्या तुलनेत तब्बल तीन ते चार पट जास्त आहेत. ऑनलाइन बुकिंग वेबसाइट्सवर प्रवासाच्या तारखा जसजशा



जवळ येत आहेत, तसतसे तिकिटांचे दर वाढत आहेत. प्रवासी मागणी वाढताच विमान कंपन्यांनी 'डायनॅमिक प्राइसिंग'च्या नावाखाली मनमानी सुरू केली आहे.

**बसवाल्यांनीही सुरू केली दरवाढीची स्पर्धा**

फक्त विमान कंपन्याच नाही, तर बस ऑपरेटर्सनीही या गर्दीचा फायदा घेतला आहे. पुणे–नागपूर मार्गावरील व्हॉल्वो आणि लक्झरी बसेसचे दर सध्या ४,५०० ते ५,५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत, जे नेहमीच्या दिवसांत १२०० ते १४०० रुपये असतात. ऑनलाइन बुकिंग साइट्सवर १७ ऑक्टोबरच्या बस प्रवासाचे दर ५,५४२ रुपये तर १८ ऑक्टोबरच्या प्रवासासाठी ५,०३८ रुपये इतके दाखवले जात आहेत. म्हणजेच दिवाळीच्या सणात नागपूरला जाण्यासाठी 'घरी परतणे'च महाग झाले आहे.

**रेल्वे तिकिटांचा 'वेटिंग'चा खेळ–** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुणे, मुंबई, दिल्ली, हैदराबाद आदी ठिकाणांहून नागपूरकडे येणाऱ्या सर्व रेल्वेच्या आरक्षणांमध्ये 'नो स्पेस'ची स्थिती आहे. तिकिटांचे आरक्षण काही दिवसांपूर्वीच पूर्ण झाले असून, तत्काल आणि प्रीमियम तत्कालमध्ये जागा मिळवणेही कठीण झाले आहे. त्यामुळे लोकांकडे बस किंवा विमान हेच पर्याय उरले आहेत, पण तेही आता खिशावर भारी पडत आहेत.



## फोटो ऑफ बीट..

### केंद्रीय कृषिमंत्र्यांची खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी घेतली भेट...

राज्यसभेचे खासदार, महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा भाजपचे जेष्ठ नेते डॉ.अनिल बोंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषीमंत्री तथा मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांची गुरुवारी (ता.१६) कृषी मंत्रालयात भेट घेतली. राज्यात कृषिमंत्री राहिलेल्या डॉ.बोंडे यांनी संसदेत गेल्यावरही शेतकरी हिताच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या या अनुभवाचा देशातल्या शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी त्यांच्याकडून देशातील राज्यांच्या सरकारकडून शेती संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्यांचा अभ्यास, प्रभावी अंमलबजावणी यासाठी प्रयत्न केले जातात. त्याच पार्श्वभूमीवर सोयाबीन, कापूस व कांदा खरेदी तसेच प्रधानमंत्री धनधान्य योजने संदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत डॉ.बोंडे यांनी चर्चा केली. या चर्चेमधून आगामी काळात शेती क्षेत्रातील ऐतिहासिक निर्णय घेतले जाणार आहेत. शेतकऱ्यांचा त्याचा मोठा फायदा होईल, अशी माहिती डॉ.बोंडे यांनी दिली

## संघाच्या जबलपूर बैठकीत सुटू शकतो भाजप अध्यक्षाचा तिढा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक ३०, ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबरदरम्यान मध्य प्रदेशातील जबलपूर येथे आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत संघाशी संबंधित विषयांसोबतच भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षाबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. भाजप वर्तुळात चर्चेला असलेल्या ६ नावांपैकी एकावर शिक्कामोर्तब होईल की, धक्का तंत्राने आणखी निराळेच नाव पुढे येईल या प्रश्नाच्या उत्तरासाठी भाजप कार्यकर्ते या बैठकीची चातकासारखी वाट पाहत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ. भा. प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी २२ सप्टेंबर रोजी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत संघाच्या अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान मध्य प्रदेशच्या जबलपूर येथे होणार असल्याचे सांगितले होते. यंदा संघ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांना गती देण्याच्या उद्देशानेदेखील बैठकीत चर्चा होणार असल्याचे आंबेकर यांनी सांगितले.

**भाजपची संघटनात्मक स्थिती बिकट–**भाजप गेल्या ११ वर्षांपासून विविध राज्यांसह केंद्राच्या सत्तेत आहे. परंतु, नरेंद्र

### संघ शताब्दी कार्यक्रमांना देशामध्ये गती देणार

मोदींच्या चेहऱ्यावर सत्तेचा लाभ घेणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या पक्षाला अपेक्षित संघटनात्मक बळकटी अद्याप मिळालेली नाही. भाजपमध्ये कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची तोबा गर्दी असली तरी ग्राउंड लेव्हल आणि ग्रासरूटवर शिस्त, नियोजनाचा अभाव दिसून येतो. पक्षाचे बहुतांश काम सोशल मीडिया पुरतेच मर्यादित असल्याचे निरीक्षण पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांनी नोंदवले. त्यामुळे विविध राज्यांसह पक्षाला राष्ट्रीय अध्यक्षाची गरज असल्याचे भाजपमध्ये बोलले जातेय.

**कार्यकर्त्यांची उत्कंठा शिगेला** महाराष्ट्रात भाजपने जानेवारी २०२५ मध्ये रवींद्र चव्हाण यांना कार्यकारी अध्यक्ष करत आगामी प्रदेशाध्यक्ष कोण असेल याचे संकेत दिले होते.




परंतु, इतर राज्ये आणि राष्ट्रीय अध्यक्षांबाबत अशा प्रकारची कार्यपद्धती पक्षाने स्वीकारलेली नाही. त्यामुळे नवा अध्यक्ष कोण असेल याविषयी पक्ष कार्यकर्त्यांना कमालीची उत्कंठा आहे. तेव्हा या प्रश्नाचे उत्तर संघाच्या आगामी जबलपूर येथे आयोजित बैठकीत मिळेल, असा विश्वास भाजप कार्यकर्त्यांना आहे.

# ती आत्महत्या नव्हे तर खूनच

## लग्नाच्या तगाद्याने त्रस्त प्रियकराकडून प्रेयसीचा गळा आवळून हत्या

### चांदूर रेल्वे शहर हादरले – मानवी नात्यांचा विदारक शेवट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ चांदूर रेल्वे –** प्रेम, विश्वास, नातं आणि भावना – या सगळ्यांचा एकाच क्षणात केलेला निर्दयी अंत! चांदूर रेल्वे शहरातील डांगरीपुरा परिसरात घडलेली ही हृदयद्रावक घटना ऐकून प्रत्येकाच्या अंगावर काटा उभा राहतो आहे. एका तरुणाने आपल्या प्रेयसीचा गळा आवळून खून केला आणि तिचा मृतदेह रेल्वे पुलाजवळ फेकून दिला. ही घटना फक्त एका स्त्रीचा मृत्यू नाही, तर प्रेम आणि विश्वासाच्या नात्याचाही अंत आहे. या प्रकरणी आरोपी शुभम विठ्ठलराव हटवार (वय २८, रा. डांगरीपुरा, चांदूर रेल्वे) याला पोलिसांनी अटक केली असून, मृतक प्रेयसीचे नाव पूजा सूरज उके (वय २५, रा. डांगरीपुरा) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम आणि पूजा यांच्यात अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध होते. हे प्रेम एकेकाळी निरागस आणि निर्मळ होतं, परंतु काळानुसार परिस्थिती बदलत गेली.दरम्यान, पूजाचे लग्न शिराळा (पुसदा) येथे झाले. पण पतीच्या व्यसनाधीनतेमुळे आणि सततच्या मानसिक त्रासामुळे ती माहेरी चांदूर रेल्वेला परत आली. तिच्या आयुष्यात एका लहान मुलीचाही जन्म झाला होता. दुसरीकडे शुभमचेही लग्न झाले होते. तरीही दोघांचे जुने नाते पुन्हा प्रस्थापित झाले. पूजाने शुभमवर लग्नाचा तगादा लावायला सुरुवात केली. शुभम या मानसिक तणावाने त्रस्त होत गेला आणि याच तणावाने अखेर एका निष्पाप जीवाचा बळी घेतला.

१५ ऑक्टोंबरच्या मध्यरात्री शुभमने पूजाला आपल्या घरी बोलावले. दोघांमध्ये झालेल्या वादानंतर शुभमने तिचा गळा आवरून निर्दयपणे खून केला. मृतदेह लपवण्यासाठी त्याने पूजाचे प्रेत स्थानिक स्मशानभूमीजवळील रेल्वे पुलाजवळ पहाटे ३.३० ते ४ च्या दरम्यान नेऊन ठेवले. त्यानंतर रेल्वे गेल्याने तिच्या शरीराचे तुकडे झाले, एक भयानक आणि मानवी संवेदनांना चिरडून टाकणारा प्रसंग. १५ ऑक्टोंबरला सकाळी सुमारे ११ ते १२ वाजता रेल्वे पुलाजवळ मृतदेहाचे तुकडे आढळताच परिसरात खळबळ उडाली. एकेकाळी जिच्यावर तो प्राणापेक्षा प्रेम करत होता, तिच्या अस्तित्वाचे अवशेष पाहून पोलिसांच्याही मन सुन्न झाले.




**भावाच्या तक्रारीवरून उघड झाला खून–** पूजा सकाळपासून घरी न आल्याने तिचा भाऊ रोहित शंकर बावनथळे याने चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यानंतर त्याला बहिणीचा रेल्वेखाली कटून मृत्यू झाल्याचे समजले. परंतु पोलिसांच्या तांत्रिक तपासानंतर खऱ्या घटनेचे धागेदोरे सापडले. आरोपी शुभमला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असता, त्याने कबुली दिली की पूजाने वारंवार लग्नासाठी दबाव आणल्यामुळे त्याने खून केल्याचे सांगितले. त्याच्या या थंड शब्दांनी चौकशीदरम्यान पोलिसांच्याही अंगावर शहारे आले.

**शहरात शोककळा–** या घटनेने चांदूर रेल्वे शहरात शोककळा पसरली आहे. एकीकडे पूजाच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे, तर दुसरीकडे प्रेमाचे हे विदारक रूप पाहून समाजातही चिंतन सुरू झाले आहे.प्रेमात अपयश, नात्यातील दबाव आणि मानसिक तणावाचा शेवट हत्या असेल, तर मानवतेचा अर्थच हरवतो.

### पोलिसांचा तपास सुरू – आणखी आरोपी वाढण्याची शक्यता

या प्रकरणी शुभम हटवार याच्यावर भारतीय दंड विधान कलम १०३(१)/२३८ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अजय आकरे, तसेच पीएसआय नंदलाल लिंगोट, कर्मचारी रितेश आंधळे, राहुल इंगळे, प्रशांत ढोके, योगेश कडुकार, अमोल घोडे, सागर पाचपोर, प्रवीण मेश्राम, रवी भुताडे आणि हेड कॉन्स्टेबल नितीन शेंडे या पथकाने केला. या घटनेत आणखी काही लोकांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## केंद्रीय मंत्री म्हणाले– लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेसोबत आल्यानेच पराभव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ नागपूर –** लवकरच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक होणार आहे. त्यासाठी सगळ्याच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरवात केली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन्ही बंधूंच्या पक्षांची युती आणि राज ठाकरे यांचा महाविकास आघाडीत प्रवेशाबाबत काय होणार? याकडेही सगळ्यांचे लक्ष लागले आहे. त्यातच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेसोबत आल्यानेच आमचा पराभव झाल्याचा दावा केला आहे. रामदास आठवले नेमके काय म्हणाले? आपण जाणून घेऊ या.

केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री रामदास आठवले हे नागपूर दौऱ्यावर आले असताना त्यांनी माध्यमांशी रविभवन येथे संवाद साधला. यावेळी रामदास आठवले यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले. रामदास आठवले म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस स्वतंत्रपणे लढेल अशी शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडेल. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे महायुतीसोबत आले, पण त्यातून अपेक्षित फायदा झाला नाही. मात्र, विधानसभेत मनसे युतीत नव्हती तेव्हा महायुतीला अधिक जागा मिळाल्या. आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पार्टी महायुतीसोबतच राहील, असे ते म्हणाले. राज ठाकरे यांच्या संदर्भात बोलताना आठवले यांनी स्पष्ट केले की, राज ठाकरे आले तरी फारसा फायदा होणार नाही. काँग्रेस त्यांच्यासोबत जाणार नाही, ही त्यांची ठाम भूमिका असल्याचे त्यांनी म्हटले.



**ठाकरे– बंधू एकत्र आले तरी परिणाम नाही**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, नव्या सर्वेनुसार भाजप–शिवसेना (शिंदे गट)–रिपब्लिकन पार्टी महायुतीला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले तरी आमचा फायदाच होईल. महानगरपालिकांवर महायुतीचाच झेंडा फडकणार असल्याचा विश्वासही आठवले यांनी व्यक्त केला.

**नागपुरात ८ मार्चला पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाचे नागालॅन्डमध्ये दोन आमदार आहे. तर मनिपूरमध्येही नुकतीच पक्षाला अधिकृत मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्रात येत्या लोकसभा निवडणूकीत आमच्या पक्षाला दोन जागा मिळाल्यास आणि त्या दोन्ही निवडून आल्यास आमच्या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळणे शक्य आहे. देशातील जवळपास सगळ्याच राज्यांत आमचा पक्ष आहे. त्यामुळे देशभरात असलेला रिपब्लिकन गटातील आमचा एकमात्र पक्ष आहे. पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन ८ मार्चला नागपुरातील कस्तूरचंद पार्क मैदानावर घेण्याचे प्रस्तावित असून त्यात देशभरातील पक्षाचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचेही रामदास आठवले यांनी सांगितले.

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची राजापेठ परिसरात पार्कींग संदर्भात पाहणी

## वाहतूक शिस्तीसाठी दिले महत्वाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

अमरावती शहरातील वाढती वाहतूक आणि मर्यादित पार्किंग व्यवस्था लक्षात घेता, अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज राजापेठ परिसरात प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक नियोजन आणि पार्किंग व्यवस्थापनासंबंधी सविस्तर आढावा घेतला. शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, नागरिकांना वाहनतळाच्या अभावामुळे होणारा त्रास कमी व्हावा आणि प्रमुख मार्गांवरील गर्दी टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राजापेठ हा शहरातील व्यावसायिक आणि गर्दीचा भाग असल्याने येथे वाहनांची वाढती वर्दळ आणि अनियमित पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सकाळी राजापेठ परिसरातील मुख्य रस्ते, चौक आणि अंडरबायपास परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान वाहतूक व्यवस्थापन अधिकाऱ्यांसह मनपाचे अभियांत्रिकी विभाग, झोन अधिकारी आणि वाहतूक पोलीस उपस्थित होते.आयुक्तांनी पाहणी दरम्यान ऑटो स्टँड उभारणी तातडीने करण्याचे निर्देश दिले.

तसेच अंडरबायपास मार्गावरून जाणाऱ्या वाहनांचे नियोजन सुयोग्य पद्धतीने करण्याचे आदेश देण्यात आले, ज्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक दाब कमी होईल. आयुक्तांनी वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक ठिकाणी वाहतूक



फलक, दिशादर्शक बोर्ड आणि बॅरिकेड्स बसविण्याचे तसेच शिस्तभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे, फुटपाथवरील अतिक्रमणे आणि अनधिकृत पार्किंग हटविण्याची मोहीम राबविण्याचे निर्देशही आयुक्तांनी संबंधित झोन अधिकारी आणि वाहतूक विभागाला दिले. नागरिकांना नियमांचे पालन करून निश्चित जागेतच वाहन उभे करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या की, शहरातील वाहतूक शिस्त राखणे आणि नागरिकांना सुलभ, सुरक्षित प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे हे महानगरपालिकेचे प्राधान्य आहे. मनपा प्रशासन, वाहतूक पोलीस आणि नागरिकांनी परस्पर सहकार्य केल्यास अमरावतीची वाहतूक व्यवस्था नक्कीच सुधारेल.


या पाहणीदरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांना आयुक्तांनी राजापेठ परिसरातील सर्व मुख्य चौक, बाजारपेठ परिसर आणि बसस्थानकाजवळील पार्किंग क्षमतेचे पुनर्मूल्यांकन करण्याचे निर्देशही दिले. आवश्यक असल्यास नवीन पार्किंग झोन निर्माण करण्याबाबत अभ्यास अहवाल तयार करण्याचे आदेश देण्यात आले.

मनपा प्रशासनाने पुढील काही दिवसांत राजापेठ परिसरात वाहतूक सुधारणा आराखडा तयार करून तो अमलात आणण्याची तयारी सुरू केली आहे. या आराखड्यात पार्किंग झोनचे पुनर्निर्धारण, वाहनांच्या एकमार्गी हालचाली, तसेच पादचारी मार्गांचे संरक्षण या गोष्टींना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.शहरातील वाहतुकीच्या शिस्तीसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक असल्याचे सांगत आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सर्व वाहनचालक आणि व्यापाऱ्यांना महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले.

# २१ नोव्हेंबरला महापालिकेची अंतिम मतदारयादी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या हालचाली वाढत्या असून अंतिम प्रभागरचना प्रसिध्द झाल्यानंतर आता मतदारयादीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २१ नोव्हेंबरला अंतिम मतदारयादी प्रसिध्द करण्यात येईल, तर मतदान केंद्रनिहाय यादी १० डिसेंबरला प्रसिध्द करण्यात येणार आहे.



राज्य निवडणूक आयोगाने जाहीर कैलेल्या कार्यक्रमानुसार महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करताना १ जुलै २०२५ ही अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली आहे. वर्ष २०११ या लोकसंख्येवर आधारित ही यादीअसली तरी लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर मतदारसंख्या वाढली आहे. साधारणतः सहा लाख ७६ हजार ४२८ मतदारांची नोद महापालिका क्षेत्रात आहे, तर ४५० च्या जवळपास मतदानकेंद्र २२ प्रभागांतर्गत राहणार आहेत.महापालिकेस राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सहा नोव्हेंबरला प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात येणार असून त्यावर हरकती घेण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. त्यवरील सुनावणीअंती अंतिम मतदारयादी २१ नोव्हेंबरला जाहीर करण्यात येणार आहे. केंद्रनिहाय मतदारयादी १० डिसेंबरला प्रसिध्द करण्यात येणार आहे.

मतदारासाठी अर्हता दिनांका १ जुलै २०२५
प्रारूप मतदारयादी प्रसिध्दी ६ नोव्हेंबर २०२५
हरकती व सूचनांसाठी मुदतः ६ ते १४ नोव्हेंबर
अंतिम मतदारयादी: २१ नोव्हेंबर
केंद्रनिहाय मतदारयादी प्रसिध्दीः १० डिसेबर २०२५

# तलावावर संस्था नोंदणी करण्याबाबत आवाहन

## स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त, महिला यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती,**

अमरावती जिल्ह्यातील अमरावती तालुक्यातील ५०० हेक्टरखालील पाटबंधारे जलसंधारण विभागाचे धानोरा दिग्रस तलाव (४४ हे) हा तलाव मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. या तलावावर शासन निर्णयानुसार संस्था नोंदणी करावयाची आहे. यासाठी तलाव परीसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त व महिला यांना संधी मिळणार आहे. तरी धानोरा दिग्रस तलाव (४४ हे) या तलावावर संस्था नोंदणी करण्यास इच्छुक असलेल्या स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त व मच्छिमार महिला यांनी सहाय्यक निबंधक, (सहकारी संस्था), अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधून बातमी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत संस्था नोंदणी करीता प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय एम. एम. मेश्राम यांनी केले आहे.

# विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धक, कलावंत, साथीदार यांची राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य व अ.भा. आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेकरिता निवड

## उद्या चमूंचा प्रशिक्षण वर्ग, सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य – पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव आणि अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या चमूचा प्रशिक्षण वर्ग स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे १८, १९ ऑक्टोबर व २३ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे.

सत्र २०२५–२६ मध्ये महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य–२०२५ महोत्सव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे दि. ०५ ते ०९ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांचेकडून पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेच्या आयोजनाच्या तारखा प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाव्दारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, असे विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी कळविले आहे. तसेच अधिक माहितीकरिता त्यांचेशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात दीपोत्सव साजरा

## प्रदूषण मुक्त दिवाळी साजरा करण्याचा संकल्प



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

दिवाळी हा सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. प्रभू श्रीराम यांनी रावणाचा वध केला त्यानंतर ते अयोध्याला परत आले तेव्हापासून दिवाळी हा सण भारतात साजरा करण्याची परंपरा सुरू आहे दिवाळीनिमित्त घराघरांमध्ये दीपोत्सव प्रज्वलित करून वातावरण प्रकाशमय केले जाते तसेच घरांसमोर रांगोळ्या काढल्या जातात, फटाके सुद्धा फोडले जातात हीच परंपरा कायम ठेवत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात देखील दिवाळी उत्सव अर्थात दीपोत्सव मोठ्या आनंदात सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समवेत साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयात असंख्य दीप प्रज्वलित करून श्रींचे पूजन करण्यात आले दिवाळी या सणाचे महत्व प्राध्यापकांनी आपल्या संवादातून उपस्थितांसमोर सांगितले त्यानंतर गीत गायनाचे आयोजन सुध्दा करण्यात आले होते.सर्वात शेवटी संस्थेतील सर्व कर्मचारी यांना दिवाळी निमित्त भेट वस्तू देउन संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व प्रदूषण मुक्त दिवाळी साजरा करण्याचा संकल्प यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी केला.यावेळी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व डीन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# शैक्षणिक गुणवत्ता राखण्यास विद्यापीठ असमर्थ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

अमरावती शैक्षणिक गुणवत्ता राखण्यास अमरावती विद्यापीठ असमर्थ ठरल्याचा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने श्रमिक पत्रकार भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केला.प्रवेश परीक्षा परिणाम पदभरती अभ्यासक्रम शास्त्र संघ निवडणूक अशा महत्त्वाच्या विषयांवर योग्य वेळेत व योग्य निर्णय घेतल्यामुळे विद्यापीठ प्रशासन अपयशी ठरले असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला आहे. मागील अनेक वर्षापासून विद्यापीठाच्या कामकाजात डिसाळपणा निष्क्रियता आणि विद्याध्यांचे विषयावर प्रशासनाने गंभीरतेने लक्षणे दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्याशी खेळ चालू असल्याचा आरोपसुद्धा पत्रकार परिषदेत करण्यात आला त्यामुळे विद्यापीठाचे या निष्कर्ष कृतीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्याचे आयुष्य अधारात जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले विद्यापीठाच्या निष्क्रियतेविषयी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आंदोलन करणार असून १ ऑक्टो. पासून १० ऑक्टो. पर्यंत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा पत्रकार परिषदेत आरोपसमस्या शोध अभियान राम्रठिण्यात आले. १५ ऑक्टोबरला संमेलन घेण्यात आहे.

१६ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत विद्यापीठाच्या भोंगळ कारभाराविषयी निषेध व्यक्त करण्यात आला २६ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थी संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. ७ नोव्हेंबरला विद्यापीठांतर्गत असलेले सर्व महाविद्यालय बंद आंदोलन करण्यात येणार आहे व १४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले. या पत्रकार परिषदेला विदर्भ प्रांतमंत्री पायल किनाके, विद्यापीठ मोर्चा प्रमुख रितेश देशमुख, विदर्भ प्रात मीडिया सहसंयोजक कैवल्य रुद्र आणि अमरावती महानगर सहमंत्री गौरी भारती, मनोज साबळे, संदेश उरकुडे, योगेश शेळके, वैष्धावी दरवडे, अनिकेल कलाने, गौरी देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवाळीसाठी रघुवीरची खास मिठाई - गोल्डन फ्लावर बिस्कॉफ

## फ्यूजन आयटमला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळाली मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

प्रत्येक आनंदाचा भाग या संकल्पनेनुसार, रघुवीर स्वीट्स नेहमीच सण–उत्सवांमध्ये लोकांच्या गोड क्षणांचा भाग राहिला आहे. यंदाच्या दिवाळीला, रघुवीर स्वीट ॲण्ड नमकीनने खास गोल्डन फ्लावर नावाची राजेशाही मिठाई सादर केली आहे.



सदर ची मिठाई राजस्थानमधील कुशल कारागीरांनी तयार केली असून, यात उच्च दर्जाचे मामरा बदाम, पिसोरी पिस्ता, शुद्ध केशर व २४ कॅरेट सोन्याचा वर्ख वापरलेला आहे. गोल्डन फ्लावर ही मिठाई महालक्ष्मी देवीच्या प्रसादातून प्रेरित आहे. याची किंमत प्रति किलो २१,००० असून, ही मिठाई रघुवीर स्वीट ॲण्ड नमकीन, राजापेठ पोलीस स्टेशनजवळील शाखेत उपलब्ध आहे.

### दिवाळी गिफ्ट हॅम्पर्स

रु. २१० ते रु. ५००० पर्यंत विविध गिफ्ट हॅम्पर्स खास दिल्ली आणि मुंबईहून मागवलेल्या बॉक्सेसमध्ये सजवले आहेत. यांना देश–विदेशातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती चंद्रकांत पोपट, तेजस पोपट, वसंत ठक्कर, गोपाल पोपट, सुरेश वसानी यांनी दिली .

### खास दिवाळी मिठाया

यंदा काजू स्ट्रॉबेरी लाडू, ड्रायफ्रूट दिवा, काजू गुलाब यांसारख्या नव्या मिठायांसह काजू कतली, मावा गुजिया, दूध हलवा, जलेबी, बंगाली मिठाया इत्यादी पारंपरिक मिठाया उपलब्ध आहेत. साखरमुक्त मिठायाही मधुमेह असलेल्या ग्राहकांसाठी खास बनवण्यात आल्या आहेत.

नमकीन आणि दिवाळी फराळ:करंजी, चकली, शेव, कश्मिरी मिक्स, पंचरत्न, दालमोठ अशा चविष्ट नमकीन पदार्थांची विशेष श्रेणी सादर केली आहे.सर्व उत्पादने फूड टेक्नॉलॉजिस्टच्या मार्गदर्शनाखाली तयार केली जातात. बिस्कॉफ फ्यूजन आयटमला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

# शिक्षकांच्या न्यायासाठी ठोस पावले - पुण्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन सादर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७पुणे**



शिक्षक वर्गाला भेडसावणाऱ्या गंभीर प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा यासाठी आज पुणे येथे शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे शिक्षकांच्या तीन मुख्य मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. सह संचालक (SCERT) सौ. आवटे मॅडम व श्री. माळी साहेब यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन या मागण्या मांडण्यात आल्या.

प्रथम मुद्दा:यवतमाळ जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांनी जून २०२५ मध्ये झालेल्या वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणात (तुकडी क्रमांक ०३) प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. मात्र, एका कंत्राटी कर्मचाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे त्यांची ऑनलाइन उपस्थिती नोंदवली गेली नाही. परिणामी, या १५ शिक्षकांना प्रशिक्षण प्रमाणपत्रापासून वंचित राहावे लागले. या अन्यायाविरुद्ध शिक्षकांनी ऑफलाइन उपस्थितीचा विचार करून तात्काळ प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे.

द्वितीय मुद्दा:नवीन नियुक्त शिक्षकांचे समावेशन (Induction) प्रशिक्षण दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत ठेवण्यात आले आहे. दिवाळी हा कुटुंबासोबत साजरा करण्याचा सण असल्याने, या निर्णयामुळे शिक्षकवर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. प्रशिक्षणाचा कालावधी बदलून दुसऱ्या सत्रात घेण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तृतीय मुद्दा:पंचायत समिती पुसद अंतर्गत झालेल्या वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षणात (कुल क–१२) ४३ शिक्षकांनी सहभाग घेतला. त्यापैकी २८ शिक्षकांना कृती संशोधन (Action Research) मध्ये चुकीचे गुणांकन देण्यात आले. त्यामुळे ते अनुतीर्ण ठरवले गेले. या गैरप्रकाराविरोधात पारदर्शकतेची मागणी करत फेरमूल्यांकन करण्याचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले आहे.

तीन्ही मुद्द्यांवर अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ३–४ दिवसांत निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.


शिक्षकांच्या हक्कासाठी आवाज बुलंद करण्याचा निर्धार यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाला असून, संघर्ष सुरू असला तरी योग्य तो मार्ग नक्कीच निघेल, असा विश्वास या आंदोलनातून व्यक्त झाला आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवावर केलेल्या अपुऱ्या व राजकीय टिकेला संस्थेचे खंडन

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७व्या पुण्यतिथी महोत्सवानंतर काही राजकीय व अर्पुय़ा माहिती असलेल्या व्यक्तींनी या महोत्सवावर टीका केली होती. या टिकेला उत्तर देताना संस्थेच्या अध्यात्म विभागाचे प्रमुख यांनी स्पष्टीकरण दिले असून, अशा प्रकारच्या चुकीच्या, अर्पुय़ा आणि हेतुपुरस्सर विधानांवर कोणीही विश्वास ठेवू नये, अशी विनंती त्यांनी सर्व भाविक व नागरिकांना केली आहे.



संस्थेने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रसंतांच्या कार्याची पाविद्र्य आणि संदेश लोकांपर्यंत पोहचवण्याचे आमचे कार्य अविरत सुरू असून, कोणत्याही राजकीय प्रेरणेने आमचे कार्य प्रभावित झालेले नाही.

सदरील महोत्सव विविध सामाजिक, अध्यात्मिक व सेवाभावी उपक्रमांनी यथोचित साजरा करण्यात आला होता. यामध्ये हजारो भाविकांनी सहभाग घेतला व संत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रसार करण्यात आला.

संस्थेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे की, कोणताही कार्यक्रम पारदर्शकतेने व नियोजनपूर्वक पार पडतो. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवण्याऐवजी सत्य माहितीची खातरजमा करूनच प्रतिक्रिया द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी ५ लाखांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा

## अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचा सामाजिक उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

राज्यातील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीने सामाजिक उत्तरदायित्वाचे उदाहरण घालून दिले आहे. समितीच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी पाच लाख रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी यांच्या मार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना सुपूर्द करण्यात आला.



या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर मंत्री यशोमती ठाकूर यांच्या निर्देशानुसार हा निधी देण्यात आला. या वेळी जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार विलास इंगोले, हरिभाऊ मोहोड, डॉ. राजीव ठाकूर, सभापती हरीश मोरे, उपसभापती भैय्यासाहेब निर्मळ तसेच संचालक मंडळातील प्रकाश काळबांडे, किशोर चांगोले, नाना नागमोते, प्रताप भुयार, प्रमोद इंगोले, सतीश गोटे, आशुतोष देशमुख, बंडू वानखडे, प्रकाश कोकाटे यांच्यासह बाजार समितीचे अनेक कर्मचारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

विशेष म्हणजे, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आपला एक दिवसाचा पगारही मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करत आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. हा निधी सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांकडे सुपूर्द करण्यात आला.

या सहकार्यामुळे राज्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांना थोडासा आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अशा प्रयत्नांची गरज असून, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीने त्याचे उदाहरण प्रस्थापित केले आहे.

# पुसदा जिल्हा परिषद सर्कलमध्ये इच्छुकांची भाऊगर्दी

## काँग्रेस, प्रहार आणि भाजपची रणनीती

मंगेश तायड़े

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७नांदगाव पेठ




अमरावती तालुक्यातील पुसदा जिल्हा परिषद सर्कल नामाप्र सर्वसाधारण राखीव झाला आहे. हा मतदारसंघ पारंपरिकपणे काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. मागील पंचवार्षिक निवडणुकीत काँग्रेसचे प्रकाश साबळे यांनी या मतदार संघातून विजय मिळवला होता.त्यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ आणि निष्ठावान कार्यकर्ते श्याम देशमुख प्रबळ दावेदार असूनही यांनी पक्षनिष्ठा जपत माघार घेतली. पक्ष उमेदवारासाठी मनापासून काम केले. त्यांच्या या त्यागामुळे ते काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये त्यांनी आदराचे स्थान प्राप्त केले.मात्र यंदा समीकरणे बदललेली आहेत. प्रकाश साबळे पुन्हा तिकीटाच्या शर्यतीत असतानाच, काँग्रेसच्या वरिष्ठ स्तरावर मात्र श्याम देशमुख यांच्या नावाला दुजोरा मिळत असल्याचे बोलले जात आहे. गेल्या नऊ वर्षांत देशमुख यांनी पक्ष संघटना मजबूत ठेवणे, ग्रामपातळीवर विकासकामे राबवणे आणि कार्यकर्त्यांमध्ये एकता टिकवून ठेवणे यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांची शिस्त, संयम आणि संघटन कौशल्य यामुळे कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा मोठा प्रभाव आहे. याव्यतिरिक्त काँग्रेस गोटात काँग्रेस चे अमरावती तालुकाध्यक्ष ॲड. अमित गावंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष शैलेश काळबांडे आणि जुने निष्ठावान कार्यकर्ते नानासाहेब बोंडे या नावांचीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये उमेदवार निवड ही कठीण परीक्षा ठरणार आहे.प्रकाश साबळे यांनी शेतकऱ्यांची नाळ जोडून ठेवून सर्व घटकांसाठी काम केले त्यामुळे नेमके कुणाला तिकीट मिळणार हा संभ्रम आहे.या सर्वांमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे पवन उर्फ छोटू महाराज वसू यांचीही एन्ट्री राजकीय समीकरणे गुंतागुंतीची करत आहे. मागील निवडणुकीत अल्प मतांनी पराभव झाल्यानंतरही छोटू महाराजांनी जनसेवा थांबवली नाही. रुग्णसेवा हे त्यांचे खरे ध्येय असल्याने ते केवळ पुसदा सर्कलपुरते मर्यादित नाहीत तर संपूर्ण जिल्ह्यात त्यांच्या नि:स्वार्थ आणि अविरत रुग्णसेवेसाठी ते प्रसिद्ध आहेत. रुग्णवाहिका सेवा, रक्तदान उपक्रम, अपघातग्रस्तांना तत्काळ मदत, आणि आरोग्य शिबिरे अशा अनेक कार्यांमुळे त्यांचा समाजात भक्कम जनाधार तयार झाला आहे. म्हणूनच यंदा छोटू महाराज वसू यांना जनतेकडून संधी मिळते का, की इतर पक्षीय उमेदवारांची लाट टिकते हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.भाजपकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली तरी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक व कठोरा बु. येथील सरपंच प्रवीण अळसपुरे हे प्रमुख दावेदार मानले जात आहेत. संघटन कौशल्य आणि स्थानिक पातळीवरील प्रभावामुळे भाजपकडून त्यांच्यावर विश्वास दाखवला जाण्याची शक्यता आहे. या सर्कलमध्ये शिंदे गट व अजित पवार गटातील कार्यकर्तेही सक्रिय असले तरी भाजप उमेदवार देणार असल्याने त्यांच्याकडे सध्या अनिश्चिततेचे सावट आहे. एकूणच, पुसदा जिल्हा परिषद सर्कलमध्ये काँग्रेसमध्ये गटबाजी, भाजपमध्ये रणनीती, आणि प्रहार जनशक्ती पक्षाचा सामाजिक प्रभाव अशा त्रिकोणी स्पर्धेची रंगत वाढली आहे. जनतेच्या मनाचा कौल कोणाला मिळणार हे ठरवणारी वेळ आता जवळ आली आहे.पुसदा जिल्हा परिषद सर्कल हा मतदार संघ काँग्रेसकडे अबाधित ठेवण्यासाठी उमेदवार हा अत्यन्त महत्वाचा असणार आहे.प्रकाश साबळे आणि श्याम देशमुख यांच्यात तिकिटासाठी दावेदारी असली तरी पक्षश्रेष्ठी जुन्या उमेदवारावर पुन्हा डाव खेळणार की वर्षानुवर्षे पक्षासाठी झटणाऱ्या तसेच जनाधार असणाऱ्या श्याम देशमुख यांच्या नावावर शिक्कामोर्तब करणार हे येणारा काळच ठरवेल मात्र सत्तेत असणाऱ्या भाजपसाठी ही निवडणूक वाटते तेवढी सोपी नाही तर जनसेवक उपाधी मिळलेल्या छोटू महाराज वसु यांचे दैनंदिन सेवाकार्य असल्याने त्यांना ही निवडणूक कठीण नाही अशी चर्चा मतदार संघात रंगत आहे.

# शैक्षणिक संस्थेत पार पडलेल्या भाजपच्या राजकीय कार्यक्रमास युवक काँग्रेसचा तीव्र विरोध

## युवक काँग्रेसची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे तक्रार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अमरावती



विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे नियमबाह्यपणे आयोजित करण्यात आलेल्या भाजपच्या राजकीय कार्यक्रमाविरोधात युवक काँग्रेसतर्फे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ही तक्रार मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मा. जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्फत तसेच तांत्रिक शिक्षण संचालनालयाच्या संयुक्त संचालकांकडे सादर करण्यात आली आहे.दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजीमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भारतीय जनता पक्षाच्या इतर नेते व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संस्थेच्या आवारात राजकीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना अनौपचारिक सुट्टी जाहीर करण्यात आली तसेच संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा व परिसराचा वापर पक्षीय कार्यक्रमासाठी करण्यात आल्याचे या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.युवक काँग्रेसने या कृतीला शैक्षणिक वातावरणाच्या पवित्रतेला बाधा आणणारी व संस्थेच्या सामाजिक-शैक्षणिक उद्दिष्टांशी विसंगत असल्याचे म्हटले आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे हे भारतीय जनता पक्षाचे अमरावती शहराध्यक्ष देखील असल्याने, त्यांनी आपल्या राजकीय पदाचा गैरवापर करून संस्थेचा वापर राजकीय हेतूसाठी केल्याचा आरोप युवक काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

युवक काँग्रेसने प्रशासनाकडे सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली असून, शैक्षणिक संस्थांचा राजकीय हेतूसाठी वापर थांबवावा, असेही या निवेदनात म्हटले आहे.सदर निवेदन देताना युवक कॉंग्रेस माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, अमरावती जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अक्षय साबळे, मोहीत भेंडे, धनंजय बोबडे, सौरभ तायडे, ड.कार्तिक देशमुख, कृणाल गावंडे, प्रफुल्ल तंतरपाळे, राहुल गुडधे, प्रियल मोहोड हे युवक कॉंग्रेस पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रकल्पग्रस्तांचा सकारात्मक प्रतिसाद

## स्थलांतरणाला पूर्ण सहकार्य करण्याचे सरपंचांचे आश्वासन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७ अमरावती



निम्न पेढी प्रकल्पामध्ये बाधीत झालेल्या गावांचे दर्जेदार पुनर्वसन करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्या मान्य केल्या आहेत. निम्न पेढी प्रकल्पाच्या घळभरणीला शासनाने मान्यता दिल्याने या कामास सुरवात करण्यात आली आहे. त्यामुळे बाधित गावातील नागरिकांनी पुनर्वसित गावात तातडीने स्थलांतरीत व्हावे, या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आवाहनाला बाधीत गावाच्या सरपंचांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात आज निम्नपेढी प्रकल्पाबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, प्रसेनजित चव्हाण यांच्यासह बाधीत गावातील प्रतिनिधी निलेश मानकर, गौतम खंडारे, प्रविण तायडे उपस्थित होते. उपस्थितांना निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींच्या शंकांचे समाधान करण्यात आले. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी पुनर्वसित गावात रस्ते, दिवाबत्तीची सोय करण्यात आली आहे. तसेच १५० घरकुल मंजूर करण्यात आली आहेत. तसेच स्थलांतरणासाठी देण्यात येणारा दोन लाख रूपयांचा भत्ता एकरकमी देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले. तसेच पुनर्वसित गावांमधील सोयीसुविधांसाठी ५७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून गावाच्या मागणीप्रमाणे इतर योजनांमधून सुविधा उभारण्यात येतील. प्रकल्पामुळे १२ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचनाची सुविधा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पर्यायी रस्ते करून दिले जाणार आहे, असे सांगितले. शासनाने निम्न पेढी प्रकल्पाच्या घळभरणीची परवानगी दि. १४ ऑक्टोबर रोजी दिली आहे. त्यामुळे तातडीने हे काम हाती घेण्यात आले आहे. घळभरणीचे काम फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत प्रकल्पात पाणी साठण्यास सुरवात होणार असल्याने हा पाणीसाठा बाधीत गावात येणार आहे. त्यामुळे अद्यापही स्थलांतरीत झाले नसलेल्या नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांचे स्थलांतर करावे, अशा सुचना देण्यात आल्या. बाधित गावातील नागरिकांना प्राधान्याने घरकुल मंजूर करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही नागरिकाची निवाऱ्याशिवाय गैरसोय होणार नाही. निम्न पेढी प्रकल्प प्रधानमंत्र्यांच्या प्राधान्याचा प्रकल्प असल्याने यास गती देण्यात आली आहे. सरपंचांनी सकारात्मक पावले उचलून नागरिकांचे पुनर्वसित गावात स्थलांतरीत करावे, असे आवाहन केले. निम्न पेढी प्रकल्पातील सर्व गावांचे पुनर्वसन होण्यासाठी पारदर्शकता राखण्यात आली. विशेष पॅकेज देण्यात आल्याने प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींशी सातत्याने संवाद राखला. त्यांच्या प्रयत्नातील सातत्याने प्रकल्पबाधीत पुनर्वसित गावात जाण्यास तयार झाले आहेत. प्रकल्पबाधितांच्या मागण्या आणि देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे हा प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

# भातकुली,चांदुर रेल्वे ,तिवसा येथे काँग्रेसचे काळी दिवाळी शिदोरी आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि१७ स्थानिक
प्रतनिधींकडून



भातकुली येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्र सरकारच्या विरोधात तहसील कार्यालयावर काळी दिवाळी शिदोरी आंदोलन करण्यात आले. सततच्या अवकाळी पावसामुळे शेतकरी संकटात सापडला असून, सरकारने हेक्टरी किमान ५०,००० रुपयांची मदत जाहीर करावी, तसेच ओला दुष्काळ जाहीर करून तत्काळ कर्जमाफी करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनी काळ्या फेट्या बांधून व हातात निषेधाचे फलक घेत सरकारचा निषेध केला. तहसील कार्यालयासमोर चटणी-भाकर खाऊन शेतकऱ्यांच्या दुःखाचे प्रतीक म्हणून शिदोरी आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्यात आल्या व प्रशासनाला निवेदन देण्यात आले. तिवसा शहरात ही काँग्रेसच्यावतीने काली दिवाळी शिदोरी आंदोलन करण्यात आले

अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे येथे शेतकऱ्यांनी आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर ठेचा, भाकर व कांदा खात काळी दिवाळी साजरी करत सरकारच्या विरोधात जोरदार आवाज उठवला. महाराष्ट्र सरकारने अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीसाठी जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असून, ती शेतकऱ्यांची चेष्टा असल्याची टीका यावेळी करण्यात आली.अतिवृष्टीमुळे अमरावती जिल्ह्यात कापूस, सोयाबीन, तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची पिकं अक्षरशः जमीनदोस्त झाली आहेत. अशा वेळी सरकारने केलेली मदतीची घोषणा म्हणजे डोळ्यात अंजन घालणं असल्याचे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी आंदोलनात सहभागी होत शेतकऱ्यांच्या भावना व्यक्त केल्या. दिवाळीसारखा आनंदाचा सण शेतकरी कुटुंबांसाठी अश्रूंचा झाला आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या अश्रूंना न्याय दिला नाही, त्यामुळे आता रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही, असे ते म्हणाले.

# गडकरींवर बोलण्याची अमोल मिटकरींची लायकी तरी आहे का? -शिवराय कुळकर्णी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अमरावती



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मौन श्रद्धांजली सोहळ्यात आमदार अमोल मिटकरी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर केलेली टीका ही पूर्णपणे निराधार असून अत्यंत खालच्या पातळीवरची आहे. गडकरी हे सोहळा संपण्याआधी निघून गेले, असा आरोप करत मिटकरींनी राजकारणात सवंगपणा दाखवला आहे.असल्याचे मिटकरी म्हणालेत या भाजप प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी मिटकरी यांच्यावर पलटवार करीत मिटकरी यांची लायकी काढली.

गुरुदेव सेवा मंडळावरही त्यांनी टिका करत आगपाखड केली, ज्याचा त्या कार्यक्रमाच्या पवित्रतेशी काहीही संबंध नव्हता. भगवी टोपी घालून विचारवंत असल्याचा आव आणणाऱ्या मिटकरींनी आपल्या वक्तव्यातून केवळ वैचारिक दिवाळखोरीच सिद्ध केली असल्याचे ते म्हणाले.कार्यक्रमाचा हेतू होता मौन श्रद्धांजली - राजकारण नव्हे!राष्ट्रसंतांच्या विचारांचा आदर ठेवत, अशा प्रसंगी वैयक्तिक प्रचार किंवा राजकीय स्वार्थासाठी वापर होऊ नये, अशी जनतेची अपेक्षा असते. मात्र मिटकरींनी ती पूर्णतः धुळीला मिळवली आहे.

# धामणगावात ११२ विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण;आ प्रताप अडसड यांचा पुढाकार

## शिक्षणाच्या प्रवासात एक नवा विश्वास

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७धामणगाव रेल्वे



पी.एम.के.के.के.वाय अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अमरावती यांच्या वतीने आ प्रतापदादा अडसड यांच्या विशेष प्रयत्नाने तालुक्यातील ११२ विद्यार्थी- विद्यार्थिनींना सायकली वितरण करण्यात आले

जुना धामणगाव जिल्हा परिषद शाळा येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ प्रतापदादा अडसड तर प्रमुख अतिथी तहसीलदार अभय घोरपडे, गटविकास अधिकारी योगेश वानखडे गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर सामाजिक कार्यकर्त्या अर्चना रोठे,जिल्हा परिषद माजी सभापती रामदास निस्ताने, पंचायत समितीचे माजी सदस्य राजकुमार केला, भाजपा अमरावती जिल्हा उपाध्यक्ष कृष्णा मारोडकर, भाजपा तालुका अध्यक्ष बबलू खैरकार, प्रणव राजनकर, श्याम गंधे यांची उपस्थिती होतीजिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत तालुक्यात पहिल्यांदाच विद्यार्थ्यांना सायकली वितरीत करण्यात आल्या आगामी काळात इतर विद्यार्थ्यांना सायकली देण्यात येणार असल्याचे आमदार प्रताप अडसड यांनी सांगितले यावेळी तहसीलदार अभय घोरफडे यांनी गौण खनिज प्रतिष्ठान विषयी माहिती दिली संचालन वैभव देशमुख तर आभार सविता सुपटकर यांनी मांनले.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप
ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत